**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED JOURNAL, SEPT-OCT, 2018, VOL- 6/47*

# माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयातील भाषिक सृजनशीलता विकासासाठी संगणकाच्या साधनांचा प्रभावी वापर

**Prof. Lokhande Gokuldas Dattatray[1] & Khurana R. R.[2], Ph. D.**

[1]*Researcher*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रास्ताविक

शिक्षण हे समाजविकासाचे महत्वपूर्ण साधन आहे. अनौपचारिक शिक्षण जन्मभर जरी चालत असले तरी औपचारिक शिक्षणातून पद्धतशीरपणे मुलाचा विकास घडवता येऊ शकतो. भारताच्या आर्थिक उन्नतीसाठी आर्थिक व शिक्षणविषयक धोरणात महत्वपूर्ण बदल केले पाहिजेत याचा सल्ला देण्यासाठी नेमलेल्या राष्ट्रीय ज्ञान आयोगाने तर इयत्ता दहावीपर्यंत सर्वांना सार्वत्रिक व दर्जेदार शिक्षणाचा पुरस्कार केलेला आहे. शिक्षणक्षेत्रातील धोरण ठरवणारे, धोरणे राबवणारे प्रशासक आणि शिक्षण व्यवस्थेचा कणा असणारे शिक्षक या सर्वांनाच नवे पर्याय शोधायला हवेत. नव्या कल्पना लढवायला हव्यात. नव्या पद्धती कार्यवाहीत आणायला हव्यात. थोडक्यात म्हणजे स्वत:ची सृजनशीलता विकसीत करायला हवी.

## भाषिक सृजनशीलतेचा अर्थ

भाषा ही निर्मितीशील आहे. मोजक्या चाळीस-पन्नास ध्वनींच्या सहाय्याने आपण किती तरीशब्द, वाक्ये निर्माण करु शकतो. मोजक्या ध्वनीच्या सहाय्याने, सहजपणाने शब्द जूळणी करुन त्यातून वाक्ये जुळवतो आणि अमर्याद संदेश निर्माण करतो. मानवेतर प्राणी केवळ जैविक पातळीवरील देवघेवी पुरते ध्वनी निर्माण करुन संप्रेषणाची प्राथतिक गरज भागवतात. मनुष्य या जैविक गरजांच्या पलिकडे जाऊनविचारांची भावनांची देवघेव करण्याची क्षमता असणारी भाषा निर्माण करतो.मानवी भाषेच्या या निर्मितीच्या मुळातच एक प्रकारची सृजनशीलता दडलेली आहे.

## भाषिक सृजनशीलतेची संकल्पना

भाषेची एक नियम व्यवस्था असते. अशा नियम व्यवस्थेला व्याकरण म्हणतात. एकदाही नियम व्यवस्था आत्मसात झाली की माणूस असंख्य :भाषिक रचना करुशकतो. तोसर्व भाषा केवळ अनुकरणातूनशिकत नाही. पूवी न ऐकलेल्या भाषिक रचना त्याला समजतात व तोस्वत: विविधरचना

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

करुशकतो. या दृष्टीने भाषा ही निर्मितीशील किंवासृजनशील असते असे म्हटले जाते.या नियम व्यवस्थेचे उपयोजन प्रत्यक्ष भाषा व्यवहार करताना केले जाते.आपण बोलतो, लिहितो, वाचतो, अशा कृती करताना भाषेच्या नियमव्यवस्थेचा वापर केला जातो.हा वापर बहुस्तरीय असतो.म्हणून त्या प्रत्येकाशी बोलताना भाषा वापरण्याची पध्दती बदलली जाते. मातृभाषेत आपले हे बोलणे सवयीचे होते. त्यामुळे हा बदल आपल्या लक्षात येतोच असे नाही.परंतू अन्य भाषा शिकताना मात्र सामाजिक संबंधांबरोबर भाषेचा वापर कसा बदलताहे काळजीपूर्वक शिकावेलागते.लेखनातली भाषा व बोलण्यातली भाषा हीवेगळी असते. मुलांची भाषा, साहेबांची भाषा, शिकलेल्यांची भाषा, अडाण्याची भाषा अशी उपयोजनकर्त्यानुसार ती बदलत असते.भाषा ही अशीलवचिक असते.सृजनशील असते.आपण वाकावी तशी वाकते.तबल्यावर बोटे आपटून ध्वनी निघतो.पण तबलजी बोटांची अशी काही फिरकत जमवतो की, त्यातून प्रसन्न ध्वनिलहरीनिघतात. भाषेचाही असाचोखंदळ आणि सृजनशील वापर होतो तेव्हा काव्य, नाटय असे वाङमय निर्माण होते. म्हणी, उखाणे निर्माण होतात.

**भाषिक सृजनशीलतेचेघटक**

**१. ओघ (Fluency)**

ओघ या घटकालाच प्रवाहित्व असे म्हटले जाते.येथे कल्पनांचा अथवाविचारांचा ओघ अथवा प्रवाह अभिप्रेत आहे.सृजनशीलतेच्या दृष्टीनेही क्षमता अत्यंत वैशिष्टयपूर्ण समजली जाते. एखाद्या विषयाबाबत अथवा समस्या निराकरणाबाबत उपयुक्त अशा भरपूर कल्पना सूचत जाणे म्हणजे ओघहीक्षमता होय. म्हणजेच कल्पनांची विपुलता आणि त्या सूचण्याचा वेग या दोन्हीगोष्टी यामध्ये अपेक्षित आहे.ही क्षमता चांगली असलेल्या व्यक्तींना अखंडपणे पटापट नव्या कल्पना सुचूशकतात. एक कल्पना सुचेपर्यंत दुसरीहजरहोते. जणू काही कल्पनांचा उत्स्फूर्त प्रवाहच सुरुहोतो.अशी क्षमता असलेली व्यक्ती जास्तीत जास्त कल्पनांचा साठाखुला करते.

**२.लवचिकता (Flexibility)**

ओघ या क्षमतेपेक्षाही लवचिकताहीलक्षता अधिक वरच्या दर्जाची मानली जाते.ओघ या घटकामध्ये संख्येला महत्व होते तरलवचिकता या घटकामध्ये विविधतेला अथवा वैचित्र्याला अधिक महत्त्व आहे.म्हणून तर या घटकालाविविधता, वैचित्र्य असेहीसंबोधले जाते.नवीन कल्पना नुसत्या संख्येने अधिक

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

असूनचालत नाही.तर त्यामध्ये भरपूर विविधताही असायला हवी. एकाच प्रकारच्या अथवा एकाच साच्यातील कल्पना सुचून उपयोग नाही तर कल्पना वेगवेगळया अंगाने आणि पैलूने सुचायला हव्यात. ही क्षमता असलेल्या व्यक्तीला जरविशिष्ट प्रकारातील काही उदाहरणेविचारली तर ती एकाचक्षेत्रातील न सुचता वेगळया क्षेत्रातीलसुचवूशकतात.

**३. मौलिकता (Originality)**

सृजनशीलतेमध्ये मौलिकता हाघटकसर्वश्रेष्ठ मानला जातो.तोइतका महत्वाचा ठरतो की अनेकजण मौलिकता म्हणजेच सृजनशीलता असेही मानतात.

मौलिकता ही क्षमता ओघवलवचिकता यापेक्षाही उच्चतर मानली जाते. मौलिकता म्हणजे सर्वांपेक्षा वेगळेपणा, असामान्यपणा अथवा नाविण्यपूर्णता होय. ज आजपर्यंत अपरिचित होते, कोणालाही माहित नव्हते, असाधारणहोते ते पहिल्यांदा सूचना होय. जे कोणालाचसुचले नाही असे जेव्हा एखादया व्यक्तीला सुचते तेव्हा तेसुचणे मौलिक म्हणता येईल. त्यामुळे जी कल्पना अनेकांनासहजसुचूशकतेतिला मौलिकता म्हणता येत नाही.विचारांमध्ये अथवा कल्पनांमध्ये स्वत:चे असे काहीतरी नाविन्यपूर्ण, पूर्वी न झालेले असे आगळेवेगळे निर्माण करणेहे मौलिकतेचे लक्षण असते. त्यामुळे मौलिकता हीसृजनशीलतेचा गाभा बनून जाते.मर्म बनून जाते.प्रत्येक सृजनशील व्यक्तीच्या कामात ही मौलिकता अवश्य दिसून येते.

**४. स्पष्टीकरण (Elaboration)**

स्पष्टीकरण क्षमतेलाच विस्तार करण्याची किंवा पूर्ती करण्याची क्षमता म्हटले जाते.ही क्षमता देखीलसृजनशीलतेचे महत्वाचे अंग आहे.सृजनशीलतेत केवळ मौलिक कल्पना सुचूनचालत नाही तर त्या कल्पनेचा तितकाच प्रभावी विस्तार करता यायला हवा.एखादी कल्पना बीजविस्तारुन अविष्कार करुनविशालवटवृक्षात परिवर्तीत करता यायला हवी. एखाद्या मुदयातील त्याचे सुयोग्य उपमुद्दे सांगून विस्तारपूर्वक स्पष्टीकरण करता येणेहे या क्षमतेत अपक्षित आहे. विशेषता भाषिक किंवा साहित्यिक सृजनशीलतेच्या क्षेत्रात या क्षमतेचा प्रभाव अधिक जाणवतो.शब्दसौंदर्य, भाषा सौदर्य यांच्या माध्यमातून साहित्यिक आपले कल्पनाासौंदर्य विस्तारत असतो.

या क्षमतेलाचा पूती क्षमताही म्हटले जाते कारण एखादी अर्धवट कलाकृती त्याच अनुषंगाने पूर्णत्वाला नेता येणे देखीलसृजनशीलतेचा अविष्कार असतो.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

तंत्रज्ञानांच्या साधनांचा प्रभावी वापर

**१. संगणक**

आजच्या काळातसंगणकाचे अनन्यसाधारण महत्व आपणांस जाणवले आहे.इंग्रजी विषयातील भाषिक सृजनशीलता वाढविण्यासाठी आपल्या कार्यक्रमात संगणकाचा प्रभावी वापर कराता येऊ शकतो. विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्यातील कथालेखन, कविता तयार करणे, संवाद लेखन आणिशाब्दिकखेळ याबाबतीत प्रत्येक वेळी संगणकाच्या आधारे विद्यार्थ्यांना कथाऐकविणे तसेचसंवाद ऐकविणे आणिइंग्रजी भाषा विकसनासाठी संगणकाच्या आधारे चित्रपट दाखविणे अशाविविध उपक्रमात संगणकाचा प्रभावी वापर आपणास करता येऊ शकतो.

**२. LCD**

शिक्षक वर्गामध्ये अप्रत्यक्ष अनुभव देत असताना प्रत्यक्ष अनुभवाकडे वाटचाल करणेगरजेचे असते. या शैक्षणिकसिध्दांतावर आधारितसंशोधकाने एल सी डीचा आधारेइंग्रजी भाषेतील सृजनशीलताविकसित करण्यासाठी वापर करता येऊ शकतो. एल सी डी च्या मदतीने विद्यार्थ्यांना विविधइंग्रजी विषयातील कविता ऐकविता येऊ शकतातव इंग्रजीमधून चालणारे संभाषण संवाद लेखनाच्या विकासासाठी दाखवता येऊ शकते. एल सी डी च्या आधारे प्रत्यक्ष अनुभव देण्याचा प्रयत्न करता येऊ शकतो. तसेचइंग्रजी विषयातील भाषिक सृजनशीलताविकसित करण्यासाठी आयोजित केलेल्या व्याख्यानांचे सादरीकरणसंबंधीत तज्ज्ञांना एल सी डी च्या माध्यमातून करता येऊ शकते.

**३. यु टयुब**

इंग्रजी विषयातील लेखन कौशल्या संदर्भातील भाषिक सृजनशीलताविकसित करण्यासाठी यु टयुब हे एक प्रभावी साधन आहे. माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषा कमी प्रमाणात विकसित झालेली असते. त्यामुळे त्यांना इंग्रजीतील उपलब्ध लघुकथा यु टयुब च्या माध्यमातून दाखविता येऊ शकतात तसेचरेल्वेस्टेशनवरीलसंवाद, बँक मधील संवाद दाखविले असता त्यांची संवाद लेखन कौशल्य विकसितहोऊ शकते. सृजनशीलतेमध्ये सृजनात्मक काव्य करणेहे एक अवघड काम असते. अशाइंग्रजीतील कवितालेखनाचे कौशल्य विद्यार्थ्यांच्या मध्ये विकसित करायचे असेल तर आपणांस एकसंशोधक म्हणून यु टयुब चा प्रभावीपणे वापर करता येईल.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**४. गुगल**

इंग्रजी भाषा विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांचे शब्द समुह अधिक प्रमाणात विकसितहोणेगरजेचे असते. तसेच विद्यार्थी विचार करताना नाविण्यात्मक विचार इंग्रजीमधून करणे आवश्यक असते. हे जर आपणांस विकसित करायचे असेल तर गुगलच्या माध्यमातून अधिक प्रमाणात शब्द समुह आपणांस शोधता येतात. तसेच एकसंशोधक म्हणून भाषिक सृजनशीलता विकसनाच्या विविधक्लृप्त्या आपणांस गुगलवरसविस्तर उपलब्ध आहेत. लेखन कौशल्यातील भाषिक सृजनशीलताविकसित करण्याकरीता गुगलहे एक तंत्रज्ञानाचे प्रभावी साधन आहे.

**५. मोबाईल अध्ययन**

तंत्रज्ञानाची मोबाईल अध्ययन ही एक नवीन संकल्पना आहे.भाषिक सृजनशीलतेचाविकास करण्यासाठी मोबाईल अध्ययन या संकल्पनेचा प्रभावी वापर करुशकतो.आजच्या काळात मोबाईलमुळे जग केवळ जवळ आले नाही तर आपल्या प्रत्येकाच्या हातामध्ये हे तंत्रज्ञान उपलब्ध आहे.या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करुन आपण विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील कविता ऐकवूशकतो.तसेचसंवाद लेखन निर्मिती, कवितालेखन निर्मिती यामध्ये मोबाईल अध्ययन या संकल्पनेचा प्रभावी वापर करुन विद्यार्थ्यांच्या भाषिक सृजनशीलतेचाविकास करुशकतो. मोबाईलच्या आधारेइंग्रजीचेशब्दकोश आपणांस हाताळता येऊ शकतात. तसेच समानार्थी शब्द, विरुध्दार्थीशब्द, एकाशब्दाचे अनेक पर्यायी शब्द मोबाईलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पाहता येऊ शकतात.

**६. टेपरेकॉर्डर**

टेपरेकॉर्डर हे तंत्रज्ञानाचे आधुनिकसाधन नसले तरी याचा प्रभावीपणे वापर आजही करता येऊ शकतो.संवाद लेखन निर्मिती कवितालेखन निर्मिती कथालेखन निर्मिती या भाषेच्या विकासातील उपघटकांचा विकास करतानासंवाद, कविता आणि कथारेकॉर्ड करुन आपण त्या विद्यार्थ्यांना ऐकवूशकतो. याचा एक महत्वाचा फायदा म्हणजे यामध्ये आपण स्वत:चा आवाजरेकॉर्ड करुशकतो आणि तो विद्यार्थ्यांना ऐकवूशकतो.

**७. SWAYAM**

विद्यार्थ्यांची सृजनशीलताविकसित करण्यासाठी स्वत: सृजनशील असायला हवे. तसेच सृजनशीलतेच्या विकासामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करायचा असेल तरस्वत: तंत्रज्ञान अंगीकृत करायला हवे. याचा विचार करता स्वयम च्या माध्यमातून सृजनशीलतेबाबत आणि तंत्रज्ञानाबाबतविविध कोर्सेसआपणांस करता येऊ शकतात. त्याबाबत आपणांस योग्य माहिती आणि प्रशिक्षण घेता येऊ शकते.सदर कोर्सेस ऑनलाईन स्वरुपाचे असूनघर बसल्याही आपणांस पूर्ण करता येऊ शकते.

## ८. PPT

भाषिक सृजनशीलतेचाविकास करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे अत्यंत गरजेचे असते. सदर मार्गदर्शन करताना तंत्रज्ञानाच्या आधारे विद्यार्थ्यांना प्रभावीपणेमाहितीचे सादरीकरण पीपीटी च्या आधारे करता येऊ शकते. पीपीटीच्या माध्यमातून मिळणारा अनुभव हा प्रत्यक्ष नसला तरी आभासी प्रतिमा उभी करुन प्रत्यक्ष अनुभवाजवळ शिक्षक विद्यार्थ्यांना घेऊन जाऊ शकतो आणिहा अनुभव विद्यार्थी सहजासहजीविसरत नाहीव यातून आपणांस भाषिक सृजनशीलतेचाविकास करता येऊ शकतो.

समारोप

वरीलविवेचन केलेल्या तंत्रज्ञानांच्या साधनांचा वापर विद्यार्थ्यांची भाषिक सृजनशीलताविकसनासाठीशिक्षकांनी प्रभावीपणे केला तर निश्चितपणे विद्यार्थ्यांच्या वर्तनात बदलहोऊ शकतो आणि यामुळे विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला पोषक वातावरण निर्मिती तयार होऊ शकते.

## संदर्भ

*डबीर दिपा (२००७), बुध्दीमत्ता आणि सर्जनशीलता, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.*

*डॉ. जगताप, ह.ना., (२००८), शैक्षणिक मानसशास्त्र, नरेंद्र प्रकाशन, पुणे.*

*डॉ. तापकिर दत्तात्रेय, (२०१०), सृजनशीलता, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.*

*डॉ. कुंडले, म.बा., (२०१०), सृजनशीलता, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.*

*मराठी भाषेचे अधिष्ठान अभ्यासक्रम, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम वर्ष कला, आवृत्ती २०००*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*